नि.दि.दावा क्र.२०१/२०२२
दिपक वि. भिकन व इतर.
CNR No.MHJN090009232022

## नि.क्र.१२ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ अन्वये दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या म्हणण्यानुसार, वादीने प्रस्तुतचा दावा हा हिंदू एकत्रित कुटूंबाच्या वडिलोपार्जित मिळकती वाटणी होवून ताब्यात मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. सदरील दाव्यात हिंदू एकत्रित कुटूंबाच्या प्रत्येक भागीदार व्यक्तिस पक्षकार बनविणे आवश्यक असताना देखील वादीची आत्या म्हणजेच प्रतिवादी क्र.१ च्या मुली व प्रतिवादी क्र.२ च्या बहिणी सुनिताबाई रविंद्र देशमुख व लताबाई भाऊसाहेब औटे यांना आवश्यक पक्षकार न केलेले नाही. वादीने स्वतःच्या नावे असलेली मिळकत व प्रतिवादी क्र.१० च्या नावे असलेली मिळकत ही स्वयंघोषित, स्वकष्टार्जित असल्याचे नमूद केले व फक्त प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या नावे असलेल्या मिळकती या हिंदू एकत्रित कुटूंबाच्या वडिलोपार्जित मिळकती असल्याचे नमूद करुन दावा दाखल केल्याने संपूर्ण मिळकतीचा उल्लेख न घेता वाटणी मागितली. वादीने नमूद केलेल्या मिळकतीवर विविध बँकेचे कर्ज बोजा असताना देखील सदरील बँकेस आवश्यक पक्षकार केलेले नाही. वादीने त्याच्या नावे असलेले औरंगाबाद शहर येथील अपार्टमेंट फ्लॅट या मिळकतीस दाव्यात नमूद न केल्याने तसेच प्रतिवादी क्र.१० हिच्या नावे मौजे मानदेऊळगाव, ता.बदनापूर, जि.जालना येथील गट क्र.३६८

मधील १.५० गुंठे व ३७० मधील ३६ गुंठे या मिळकतीस दाव्यात समाविष्ट केलेले नाही. वादीने दाव्यातील वाद मिळकतीचे मुल्यांकन स्वयंघोषित नमूद केल्याने तसेच या मिळकतीचे सुमारे १५ ते २० लक्ष रुपये असलेले मुल्यांकन देखील नमूद न करता स्वयंघोषित मुल्यांकन नमूद करुन दावा दाखल करुन आवश्यक ती कोर्ट फीस भरलेले नाही. त्यामुळे, वादीचा दावा Non joinder of necessary property या गृहीतकावर खारीज होणे न्याय व गरजेचे आहे. सबब, वादीचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती प्रतिवादी क्र.१ व २ यांनी करुन नुकसान भरपाई म्हणून प्रत्येकी रक्कम रुपये १०,०००/– देण्याची मागणी त्यांनी केली आहे.

३. वादीने नि.क्र.१७ कडे प्रस्तुत अर्जावर स्वतःचे म्हणणे दाखल करुन प्रतिवादींचा अर्ज नाकारलेला आहे. वादी कथन करतो की, त्याने प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादींविरुध्द हिंदू एकत्रित कुटूंबाच्या वडिलोपार्जित मिळकती वाटणी होवून ताब्यात मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. सर्व वडिलोपार्जि व हिंदू एकत्रित कुटूंबाच्या मिळकती ह्या प्रतिवादी यांच्या नावावर आहेत. वादीने सत्य परिस्थिती समोर आणल्याने व त्याला प्रस्तुत दाव्यामध्ये यश येण्याची खात्री प्रतिवादींना आहे. प्रतिवादींनी वडिलोपार्जित मिळकतीमधील वादीचा हिस्सा डावलण्यासाठी त्याची व त्याचे आईची फसवणूक केलेली आहे. प्रतिवादींनी वादीची व न्यायालयाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केलेला आहे. वडिलोपार्जित मिळकतीमधील वादीचा हिस्सा टाळण्यासाठी प्रतिवादी हे प्रस्तुतचा दावा हा

गुणदोषावर न लढविण्याचा प्रयत्न करीत आहेत. वादी यांनी आवश्यक पक्षकारांना सामील करण्याचा अर्ज यापूर्वीच दाखल केलेला आहे. वादींनी दाव्यामध्ये काही दावा मिळकती स्वकष्टार्जित असल्याबाबत व काही मिळकती वडिलार्जित असल्याबाबत कथन केले आहे. त्यामुळे, सर्व दावा मिळकती वडिलार्जित असल्याची बाब प्रतिवादींनी सिध्द करणे गरजेचे आहे. प्रतिवादींना ज्या बँकेमार्फत कर्ज रक्कम प्राप्त झाली आहे ते या कामी आवश्यक पक्षकार होत नाही. प्रतिवादींच्या कर्जाची रक्कम ही त्यांना दावा मिळकतीमध्ये प्राप्त होणाऱ्या हिश्श्यांवर बंधनकारक राहील. दावा मिळकतीचे वादीने केलेले मूल्यमापन चुकीचे आहे याकरीता प्रतिवादींनी योग्य तो कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे, प्रतिवादींचा अर्ज आहे त्या स्थितीत नामंजूर करण्याची मागणी वादीने केलेली आहे.

४. वादी व प्रतिवादी यांनी उपस्थित केलेल्या कथनांवरुन खालील मुद्दे या न्यायालयाच्या विचाराधीन आलेले असून त्याचे निष्कर्ष कारणमीमांसेसह नोंदविलेले आहेत.

| **क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादीचा दावा हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ अंतर्गत चालविणेस पात्र आहे काय? | ...नकारार्थी. |
| २. | आदेश काय? | ...अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमीमांसा

## मुद्दा क्र.१ व २ करीता

५. प्रतिवादींनी प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ अंतर्गत दाखल करुन वादीच्या दावेस Non joinder of necessary parties तसेच Non joinder of necessary properties व मौजे मानदेऊळगाव, ता.बदनापूर येथील गट क्र.३६८ मधील १.५० गुंठे व गट क्र.३७० मधील ३६ गुंठे मिळकत दाव्यात समाविष्ट न केल्यामुळे तसेच वादीने दाव्यात केलेले दावा मिळकतीचे मुल्यांकन योग्य नसल्याकारणामुळे खारीज करण्यात यावा, असे नमूद केले आहे.

६. वादीने नि.क्र.१४ कडे दि.प्र.सं. आदेश ६ नियम १७ व आदेश १ नियम १० सह कलम १५१ अंतर्गत अर्ज दाखल करुन सुनिता रविंद्र देशमुख व लताबाई भाऊसाहेब औटे यांना प्रतिवादी म्हणून सामील करण्याची विनंती केलेली आहे. तसेच, दावा मिळकतीच्या परिशिष्ट ई मध्ये 'फ' या कलमापुढे गट क्र.३६८ पैकी १.५ आर ची जमीन नमूद करणेबाबतचीही विनंती वादीने केलेली आहे. तसेच, दाव्यातील कलम ५ मधील ८ व्या ओळीतील गट क्र.२७५ च्या ठिकाणी गट क्र.३७० चा उल्लेख करण्याची परवानगीही वादीने मागितलेली आहे. थोडक्यात, प्रतिवादींनी नि.क्र.१२ च्या अर्जामध्ये ज्या ज्या तक्रारींचा उल्लेख केलेला आहे त्या सर्व तक्रारींची दखल घेऊन वादीने नि.क्र.१४ कडे अर्ज दाखल करुन दावेकामी दुरुस्ती मागितलेली आहे.

७. वादीचा दावा हा वाटपाचा व तुटक कब्जाचा आहे. प्रतिवादी यांचाही दावा मिळकतीमध्ये कायदेशीर हक्क व हिस्सा आहे असे वादी नमूद करतो. दि.प्र.सं. आदेश ७ नियम ११ अंतर्गत आवश्यक असणाऱ्या सर्व तरतुदींमध्ये प्रतिवादींनी उपस्थित केलेल्या वरील सर्व तक्रारी समाविष्ट होत नाहीत. आवश्यक पक्षकारांना समाविष्ट केले नाही व आवश्यक मिळकतींना दावेत सामील केले नाही म्हणून दावा खारीज करण्याची तरतुद वरील आदेशांमध्ये येत नाही. प्रतिवादींनी तक्रार उपस्थित केल्यानंतरही वादीने चौकशीअंती तक्रारीस अनुसरुन दावेकामी दुरुस्ती मागितली नसती तर दावा गुणदोषावर निकाली झाला असता. तो दाव्याच्या या पूर्वस्थितीमध्ये निकाली काढता येत नाही. वादीने दुरुस्ती कामी बँकेस पक्षकार केलेले नाही. त्याचे कारणही त्याने त्याच्या नि.क्र.१७ कडील म्हणण्यामध्ये नमूद केलेले आहे. या स्थितीमध्ये प्रतिवादींच्या तक्रारीस अनुसरुन केवळ आवश्यक पक्षकाराबाबतचा मुद्दा काढून त्याची चौकशी करता येईल. परंतु, त्या कारणास्तव दावा कायद्यानेच खारीज होत नाही.

८. याशिवाय, वादीने नि.क्र.१४ कडे अर्ज दाखल करुन प्रतिवादींनी उपस्थित केलेल्या सर्व तक्रारी संदर्भात दुरुस्ती मागितलेली आहे. केवळ, दावा मिळकतीचे योग्य मुल्यांकन केले नाही म्हणून दावा खारीज करावा याबाबत आदेश ७ नियम ११ब अंतर्गत असे नमूद केलेले आहे की, वादीने दावा मिळकतीचे योग्य मुल्यांकन केले नसेल व त्याला न्यायालयामार्फत योग्य मुल्यांकन करण्याची संधी दिली असतानाही त्याने विहीत वेळेत मुल्यांकन केले

नसेल तर त्या स्थितीमध्ये दावा खारीज करता येतो. दावा मिळकतीचे मुल्यांकन चुकीचे आहे हे अद्याप ठरलेले नाही. केवळ, प्रतिवादी म्हणतो म्हणून दावा मिळकतीच्या मुल्यांकनाबाबत वादीस आदेश करता येणार नाही. त्याकरीता आवश्यक असणारी योग्य ती चौकशी व त्याबाबतचा निर्णय झाल्यानंतर प्रतिवादीने उपस्थित केलेल्या या तक्रारीचा विचार करणे योग्य होईल. सद्यस्थितीत, दावा मिळकतीचे मुल्यांकन चुकीचे आहे हे वादीने दावेकामी आणलेल्या कथनांवरुन स्पष्ट होत नसल्यामुळे प्रतिवादीने उपस्थित केलेली वरील तक्रारही दावा खारीज करणेकरीता कायदेशीर वाटत नाही.

९. अशाप्रकारे, प्रतिवादीने उपस्थित केलेल्या सर्व तक्रारी या दि.प्र.सं. आदेश ७ नियम ११ च्या कक्षेमध्ये येत नसल्यामुळे प्रतिवादींचा अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज नामंजूर करण्यात आला.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

Digitally signed by URMILA PARASHRAM KOLI
Date: 2023.10.05 11:37:50 +0530

दि.१६.०९.२०२३.

(श्रीमती.यु.पी.कोळी)
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
बदनापूर.